
# ROTARY CLUB OF KOLHAPUR CENTRAL NEWS

RI DISTRICT 3170 | CLUB NO. : 15656 | CHARTER NO. : 15656 | ESTD ON : 13.05.1978

## MONTHLY BULLETIN OCTOBER 2024



**Rtn. Stephanie Urchick**
Rotary International President



**Rtn. Sharad Pai**
District Governor (RID 3170)



**Rtn. Sanjay Bhagat**
Club President



**Rtn. Ravindra Khot**
Secretory



**Rtn. Nilesh Patil**
Treasurer

**ISSUE No. 01**
**PUBLISH DATE : 1 Dec. 2024**

**Bulletin Editor :**
Rtn. Rohanraj Shinde
Rtn. Abhay Sonavane

Scanned with OKEN Scanner

१६ नोव्हेंबर रोजी रोटरॅक्ट क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल यांच्या पुढाकाराने ब्लड डोनेशन कँप उत्साहात पार पडला. रोटरॅक्ट चे सर्व मेंबर तसेच रोटरी सेंट्रल चे मेंबर यामध्ये सहभागी झाले.














आपले मित्र रोटेरियन अविनाश चिकनीस (भाई)आणि रोटेरियन आर वाय पाटील हे व्हिएतनाम येथे होणाऱ्या इंडस्ट्रियल एक्झिबिशन साठी आज जात आहेत त्याना खूप खूप शुभेच्छा

<u>*Rotary club of Kolhapur central 2024-25*</u>

*NOTICE*

*Nov.3rd Weekaly Meeting*

*Notice is hereby given to all members of Rotary club of Kolhapur central 2024-25. The Meeting of Nov.month 3rd Weekaly Meeting of Rotary club of Kolhapur central 2024-25 will be held on 25 Nov 2024 at 7.00pm*

*Aggenda 1.RPL Planing Discssion*

*2.District Grant Project Discssion*

*3. Next Month Project Planning*

*4. Any other subject with request of members*

*ठिकाण – मोतीभाई दोशी मेमोरियल हॉल रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर, स्वयम् स्कूल, नवीन कोर्ट च्या मागे कसबा बावडा रोड, कोल्हापूर*

*All members are requested to be present on time*

*Time : 7.00pm*

*Date : 25 nov 2024*

*Menu:- पाव वडा /कांदा भजी*

| Rtn.Sanjay Bhagat | Rtn. Ravindra Khot | Rtn.Nilesh Patil |
|---|---|---|
| President | secretary | Treasurer |










# लोकमत कॅम्पस क्लबतर्फे किल्ला बनवा स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकमत कॅम्पस क्लब आणि रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलतर्फे शुक्रवार आणि शनिवारी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत भव्य किल्ला बनवा स्पर्धेचे आयोजन केले आहे. यातील विजेत्यांना सन्मानचिन्ह, आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. स्पर्धेचे गिफ्ट पार्टनर भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र आहे.

स्पर्धेसाठी बनवलेल्या किल्ल्याचा एक फोटो व फक्त एक मिनिटाचा व्हिडीओ ९५४५३२७५४५ अमर यांच्या क्रमांकावर पाठवावा. यापेक्षा जास्त फोटो किंवा व्हिडीओ पाठवल्यास तो स्पर्धक स्पर्धेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही. सोबत स्वतःचे नाव, वय, गट, किल्ल्याचे नाव, मोबाइल क्रमांक टाकावा. स्पर्धेसाठी सहा ते सोळा वयोगटातील मुलामुलींना सहभाग घेता येईल. पहिला वयोगट ६ ते १० वर्षे, दुसरा गट ११ ते १६ वर्षे आहे.

स्पर्धा दोन गटांत होईल. दोन्ही गटांतून तीन-तीन विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह, तर सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सर्व अधिकार आयोजकांकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

यासंबंधीच्या अधिक माहितीसाठी ९५४५३२७५४५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

CAMPUS CLUB
Rotary
रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल
आयोजित






Scanned with OKEN Scanner

A fort making competition was conducted on the occasion of Diwali by Rotary Club of Kolhapur Central and Lokmat Media Group. The competition was small group and large group.Many small and big mandals from Kolhapur district have registered their participation in this.A feature of the competition was that the examiners had to narrate the complete historical details of the fort being built with references.A good output we will get from this is that it is important to understand the history of our historical heritage from children to youth.Otherwise today it seems that forts and forts are only a matter of tourism.It was heartening to see the enthusiasm of the children while distributing the prizes.




**लोकमत**

# भव्य किल्ला स्पर्धेत सिल्व्हर स्प्रिंग सोसायटी, विजेता तरुण मंडळ प्रथम

## लोकमत कॅम्पस क्लबच्या किल्ला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

भव्य किल्ला बनवा स्पर्धा २०२४

गिफ्ट पार्टनर



विजेता तरुण मंडळ, किल्ला अहिवंतगड

### विजेते पुढीलप्रमाणे

- **लहान गट :** १) सिल्व्हर स्प्रिंग सोसायटी २) सम्राट सिंग पाटील ३) रेयांश शिरगावे ४) तन्वी तांबुळे
- **मोठा गट :** १) विजेता तरुण मंडळ २) जय हनुमान भक्त मंडळ ३) अचानक तरुण मंडळ, शिये, ४) बाल नेताजी तरुण मंडळ ५) श्री गणेश तरुण मंडळ



दिवाळीच्या सुट्टीत किल्ले तयार करण्याच्या निमित्ताने बच्चे कंपनी इतिहासाला उजाळा देतात यातून गड-किल्ल्यांचे जतन करण्याची प्रेरणा मिळते तसेच विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची आवड निर्माण होते.

- **संजय भगत,** अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकमत कॅम्पस क्लब आणि रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलतर्फे आयोजित भव्य किल्ला स्पर्धेला बालकिल्लेदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. या भव्य किल्ला स्पर्धेत छोट्या गटात सिल्व्हर स्प्रिंग सोसायटीने प्रथम तर मोठ्या गटात विजेता तरुण मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला. यंदाच्या दिवाळीत कॅम्पस क्लबने या बच्चेकंपनीला मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. दिवाळीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या भव्य किल्ला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन छोट्या दोस्तांनी एकाहून एक सरस किल्ले बांधून इतिहासाच्या पाऊलखुणा जागृत करण्याचा प्रयत्न केला. या स्पर्धेतील भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र या स्पर्धेचे गिफ्ट पार्टनर होते. या स्पर्धेसाठी बनवलेल्या किल्ल्यांचा एक फोटो आणि फक्त एक मिनिटांचा व्हिडिओ मागविण्यात आला होता. सोबत किल्ला तयार करणाऱ्यांचे नाव, वय, गट आणि किल्ल्याचे नाव, मोबाईल क्रमांक देण्याचे आवाहन करण्यात आले होते. सहा ते सोळा वयोगटांतील मुला-मुलींनी या स्पर्धेत भाग घेतला. पहिल्या वयोगटात ६ ते १० आणि दुसऱ्या वयोगटांत ११ ते १६ वयोगटांतील स्पर्धक सहभागी झाले होते. दोन गटांतील या स्पर्धेतून दोन्ही गटांतून प्रथम तीन आणि उत्तेजनार्थ रँक देण्यात आली.

Hello Kolhapur
Page No. 3 Nov 13, 2024
Powered by: erelego.com

This year too, like every year, the members of Achanak Mitra Mandal have made a replica of Vijaydurg fort in a very academically intricate way. To make this fort, the workers of the group visited the fort and studied the fort with its historical references

President of Rotary Club of Kolhapur Central Rtn. Sanjay Bhagat worshiped the image of Chatrapati Shivaji Maharaj and cut the ribbon and opened the fort for everyone to see







Scanned with OKEN Scanner

सोमवार दिनांक १८ नोव्हेंबर रोजी प्रिन्सेस इंदूमती गर्ल्स हायस्कूल च्या इंटरॅक्ट क्लब चा २०२४-२५ या वर्षाचा ३७ वा इन्स्टॉलेशन चा कार्यक्रम घेण्यात आला. इन्स्टॉलेशन ऑफिसर म्हणून रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल चे प्रेसिडेंट रो.संजय भगत होते. त्यांच्याबरोबर या कार्यक्रमासाठी रो.बदाम पाटील, रो.नरेश शिंगाडे, रो.रवींद्र खोत, रो.हेमंत पाटील उपस्थित राहिले.

शाळेच्या वतीने सर्व पाहुण्यांच स्वागत करण्यात आलं.त्यानंतर आउटगोइंग इंटरॅक्ट प्रेसिडेंट चंद्रलेखा देसाई हिने गेल्या वर्षभरात राबवलेल्या आणि घेतलेल्या कार्यक्रमांची माहिती दिली.

त्यानंतर इनकमिंग प्रेसिडेंट अद्विता तेरेदेसाई हिची निवड करण्यात आली. अद्विता तेरेदेसाई हिने यावर्षीची टीम जाहीर केली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ साधना पवार यांनी मार्गदर्शनपर भाषण केले,इंटरॅक्ट च्या मार्गदर्शक टीचर सौ रुचिरा रुईकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले,त्यानंतर रो.संजय भगत यांनी रोटरी च्या कामाविषयी व पुढील वर्षात करावयाच्या उपक्रमाविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी याप्रसंगी ग्रुप डान्स सादर केला. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या प्रमुख सौ माधुरीमाराजे यांचं मोलाच सहकार्य लाभलं.










Scanned with OKEN Scanner

## रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल पुरस्कृत इंदुमतीदेवी इंटरॅक्ट क्लब आयोजित ३९वी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा२०२४

***निमंत्रण ***

आदरणीय रो.संजय भगत सर,
(प्रेसिडेंट,रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल)
दरवर्षी प्रमाणे पुण्यशील इंदुमतीदेवी राणीसाहेबांच्या पुण्यतिथी निमित्त,
इंदुमतीदेवी इंटरॅक्ट क्लबने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या आहेत तरी या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे म्हणून आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

स्थळ:
प्रिन्सेस इंदुमती देवी हायस्कूल
वेळ:
बुधवार दि.२७ नोव्हें.२०२४
सकाळी १२:३०वाजता

कळावे,
मा.मुख्याध्यापिका व स्पर्धा संयोजन समिती
इंदुमती देवी हायस्कूल

### इंदुमतीदेवी इंटरॅक्ट क्लब आयोजित
३९वी प्रिन्सेस इंदुमतीदेवी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा नोव्हें.२०२४-२५

प्रति,
मा.मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,स.न.वि.वि.वि.
............................................ कोल्हापूर.

महोदय/महोदया,

आमच्या महाराणी शांतादेवी गायकवाड गृहशास्त्र शिक्षण संस्थेचे प्रि.इंदुमतीदेवी हायस्कूल व रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल पुरस्कृत इंदुमतीदेवी इंटरॅक्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी आपल्या प्रशालेतील स्पर्धक पाठवून सहकार्य करावे ही विनंती.

⊙ स्पर्धा दोन गटामध्ये घेण्यात येणार असून त्यांचे विषय पुढीलप्रमाणे आहेत.

| गट पहिला (इ.५वी ते ७वी) | गट दुसरा (इ.८वी ते १०वी) |
| --- | --- |
| १) पुण्यशील इंदुमतीदेवींच्या जीवनातील मला आवडलेले प्रसंग | १) पुण्यशील इंदुमतीदेवी: एक अष्टपैलू व्यक्तिमत्व |
| २) माझी मायबोली - मराठी | २) कृत्रिम बुध्दीमत्ता आणि विश्व |
| ३) सोशल मिडिया व आजचा विदयार्थी | ३) स्त्री सुरक्षेचे विदारक सत्य |
| ४) वसा स्वच्छतेचा - मार्ग समृध्दीचा | ४) उद्योगरत्न रतन टाटा |

⊙ भाषणाची वेळ : लहान गट - ५मि. / मोठा गट - ७मि.
⊙ स्पर्धेची नावे पाठविण्याची अंतिम तारीख : सोमवार २५/११/२०२४
⊙ स्पर्धेचा दिवस : बुधवार दि.२७/११/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता
⊙ स्पर्धेचे ठिकाण : प्रिन्सेस इंदुमतीदेवी हायस्कूल फॉर गर्ल्स,जुना राजवाडा कोल्हापूर.२५४६१८०
⊙ बक्षीसाचे स्वरूप : दोन्ही गटातील पहिल्या तीन विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिके,कायमस्वरूपी स्मृतीचिन्ह व सर्टिफिकेट देण्यात येईल. प्रत्येक गटात ३ क्रमांक व २ उत्तेजनार्थ क्रमांक काढले जातील.
⊙ स्पर्धेचे नियम व अटी :-
१)प्रत्येक शाळेने दोन्ही गटामध्ये एक-एक स्पर्धक पाठवणे आवश्यक आहे आणि "प्रि.इंदुमतीदेवी" या विषयावर किमान एका स्पर्धकाने बोलणे आवश्यक आहे.
२)एकाच गटात स्पर्धक आल्यास त्याचा बक्षीसासाठी विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

❖ पारितोषिक वितरण समारंभ ❖

शनिवार दि.३० नोव्हें.२०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता प्रशालेच्या मैदानावर होईल. त्यावेळी दोन्ही गटातील प्रथम क्रमांकांना पुन्हा भाषण करावे लागेल.

◆स्पर्धा आयोजक◆

| * प्रेसिडेंट * | * स्पर्धा प्रमुख * | * मुख्याध्यापिका * |
| --- | --- | --- |
| इं.अदिता तेरेदेसाई | सौ.रुचिरा रुईकर | सौ.साधना पोवार |
| इंदुमतीदेवी इंटरॅक्ट क्लब | सौ.योगिता कुंभार | प्रि.इंदुमतीदेवी हायस्कूल फॉर गर्ल्स,कोल्हापूर. |

















प्रिन्सेस इंदुमतीदेवी हायस्कूल मधील रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल पुरस्कृत इंटरॅक्ट क्लब यांच्या संयुक्त पुढाकाराने ३९ वी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा २७ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली.

स्पर्धेमधे वेगवेगळ्या स्कुल मधील २५ स्पर्धकानी भाग घेतला.स्पर्धा लहान आणि मोठा अशी दोन गटामधे होती. स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी सेंट्रल चे प्रेसिडेंट संजय भगत.सेक्रेटरी रवींद्र खोत,सीनियर रोटेरियन जिया मोमीन, रोटेरियन हेमंत पाटील आणि रोटेरियन विनायक धाकोरकर यांनी उपस्थित राहून विजेत्याना बक्षीस वितरण केले. यावेळी रो.संजय भगत व रो.जिया मोमीन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धा खूप उत्साहात पार पडली.

**कोल्हापूर जिल्हा TODAY** कोल्हापूर, शुक्रवार, २९ नोव्हेंबर २०२४

## इंदुमतीदेवी हायस्कूलमध्ये आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : राणी इंदुमतीदेवी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राणी इंदुमतीदेवी हायस्कूलमध्ये ३९ वी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा इंटरॅक्ट क्लब व रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने झाली.

कार्यक्रमास रोटरीचे प्रेसिडेंट संजय भगत, सेक्रेटरी रवींद्र खोत, जिया मोमीन, पर्यवेक्षिका सुलक्षणा मुळे उपस्थित होते. प्रशालेच्या मुख्याध्यापिका साधना पोवार यांनी प्रास्ताविक केले. वक्तृत्व स्पर्धेत ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी असे दोन गट होते. स्पर्धेत इंदुमतीदेवींच्या जीवनातील मला आवडलेले प्रसंग, माझी मायबोली मराठी, सोशल मीडिया व आजचा विद्यार्थी, वसा स्वच्छतेचा मार्ग समृद्धीचा, पुण्यशील इंदुमतीदेवी : एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विश्व, स्त्री सुरक्षेचे विदारक सत्य, उद्योगरत्न रतन टाटा आदी विषयांवर विद्यार्थिनींची भाषणे झाली. स्पर्धेचे परीक्षण निशा साळोखे व सरोज पोवार यांनी केले. रुचिरा पाटील यांनी आभार मानले. स्पर्धाप्रमुख योगिता कुंभार तसेच शाळेचे शिक्षक, स्पर्धक, शिक्षक व पालक उपस्थित होते.

### इंदुमतीदेवी यांची पुण्यतिथी विविध कार्यक्रमांनी

कोल्हापूर : प्रि. इंदुमतीदेवी हायस्कूलच्या प्रांगणात इंदुमतीदेवी राणीसो यांची ५३ वी पुण्यतिथी विविध कार्यकमांनी झाली. कार्यक्रमासाठी महाराणी शांतादेवी गायकवाड गृहशास्त्र शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा आशा पाटील प्रमुख उपस्थित होत्या. रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलचे हेमंत पाटील व वीणा मोहिते, खजानीस रंजना स्वामी, मुख्याध्यापिका साधन पोवार, माजी शिक्षिका सुलोचना कोळी उपस्थित होते. यावेळी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण झाले. मुख्याध्यापिका पोवार यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्षा आशा पाटील, हेमंत पाटील व सुलोचना कोळी यांनी मार्गदर्शन केले. इंटरॅक्ट शिक्षिका रूचिरा रूईकर व योगिता कुंभार यांनी सूत्रसंचालन केले.

## Birthday Celebration








Scanned with OKEN Scanner

# BOD Meeting / Close meeting

सोमवार दिनांक २ नोव्हेंबर रोजी सकाळी हॉटेल शबरी येथे नोव्हेंबर महिन्याची **BOD** घेण्यात आली व संध्याकाळी सात वाजता डिसेंबर महिन्याची पहिली विकली मीटिंग व नोव्हेंबर महिन्याची क्लोज मीटिंग रोटरियन संजय कदम यांच्या फार्म हाऊस वरती घेण्यात आली.सर्व मेंबरना डिनर ची व्यवस्था संजय कदम यांच्या वतीने करण्यात आली होती.

**मीटिंग मधील विषय खालील प्रमाणे.**


Rotary club of Kolhapur central 2024-25

NOTICE

Oct.Close Meeting &Nov.1st Weekaly Meeting

Notice is hereby given to all members of Rotary club of Kolhapur central 2024-25. The Close Meeting of oct.month and November 1st Weekaly Meeting of Rotary club of Kolhapur central 2024-25 will be held on 11Nov 2024 at 7.00pm

Aggenda 1.Oct month BOD Meeting Discssion

2.RPL Disscission -Past President Meeting Date Finalised

3. Next Month Project Planning

4. Completion Of Work

5. Oct.24 Month Expenses

6.District Grant Project Discssion

7. District Sport Discssion

8. Any other subject with request of members

ठिकाण – मोतीभाई दोशी मेमोरियल हॉल रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर, स्वयम् स्कूल, नवीन कोर्ट च्या मागे कसबा बावडा रोड, कोल्हापूर

All members are requested to be present on time

Time : 7.00pm

Date : 11 nov 2024

Menu:- पाव वडा /कांदा भजी

Rtn.Sanjay Bhagat President — Rtn. Ravindra Khot secretary — Rtn.Nilesh Patil Treasurer

१) नोव्हेंबर महिन्यात झालेल्या प्रोजेक्ट व इव्हेंट ची सर्वांना माहिती दिली .

२) महिलांच्या साठी दरवर्षी प्रमाणे गोधडी प्रशिक्षण कार्यशाळा घेणे विषयी चर्चा झाली.

३) आपल्या क्लब च्या मालकीच्या हॉल मध्ये आपल्या मेंबर व फॅमिली साठी योगा प्रशिक्षण क्लास सुरु करण्याचे ठरले. त्याचबरोबर त्या हॉलमध्ये टेबल टेनिस व कॅरम या खेळासाठी लागणाऱ्या सुविधा खरेदी करण्याचे ठरले.

४) अवयव दान याविषयी तज्ञ असणारे गेस्ट विकली मीटिंग ला बोलावून क्लब मेंबर, फॅमिली व मित्रमंडळी यांना अवयव दानाचे महत्व पटवून देणे.

५) काही गरजू लोकांनी कानाच्या मशीनची मागणी क्लब कडे केली आहे. त्याविषयी चर्चा केली व त्या लोकांची टेस्ट रिपोर्ट घेवून त्यांची मागणी योग्य असेल तर मशिन देण्याचे ठरले.

६) आपले डी जी यांनी सुचविल्या प्रमाणे प्रत्येकी दोन कार्पेट घेण्याचे आवाहन सर्व मेंबरना केले.

७) पुढील महिन्यात होणाऱ्या कॉन्फरन्स साठी जास्तीत जास्त मेंबर नि रजिस्टर करण्याचे आवाहन केले.

८) यावर्षी क्लब सोडून गेलेले राहुल डूनुंग व सुहास मिठारी यांनी क्लब कडे पेल ची मागणी आहे. त्यांना देनेचे ठरले.

९) आपल्या क्लबचि N O C न घेता किरण पाटील यांना स्पेक्ट्रम क्लब ने मेंबरशिप दिली त्याविषयी त्यांना पत्र देवून विचारणा करणे.

१०) मागील दोन वर्षाच्या झालेल्या आर पी एल चे सूर्यकांत पाटील अंकल आणि सत्यजित पाटील यांच्याकडून अकाउंट स्टेट मेंट घेणे.

११) डेंटिस्ट डॉ. देशपांडे सर आपल्या क्लब चे मेंबर होवू इच्छित आहेत. रो. शैलेश देशपांडे यांच्याकडे त्यांनी सांगितले आहे आणि ते आपले जुने मेंबर होते. त्याविषयी सर्वांनी मंजुरी दिली.

१२) डी जी नी सुचविल्या प्रमाणे मेजर डोनर विषयी चर्चा झाली. रो. समीर जोशी हे मेजर डोनर होण्याच्या जवळ आहेत.

१३) आपला सर्वात महत्वाचा फंड राईजिंग असो किंवा रोटरी चे पब्लिक रिलेशन वाढवणे असो असा लोकप्रिय इव्हेंट फेब्रुवारी मध्ये घेणेचा असून त्याविषयी आर पी एल ची जी कमिटी आहे तिची मीटिंग घेण्याचे ठरले आहे.

१४) एक डिसेंबर रो.अभिजित भोंसले, तीन डिसेंबर रो. रविराज शिंदे व आठ डिसेंबर रो. सचिन गाडगीळ यांचा वाढदिवस येतो व मीटिंग मध्ये तिघांचे वाढदिवस केक कट करून साजरे केले.

१५) या महिन्यात विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन कार्यक्रम इंदुमती हायस्कूल, देवी पार्वती हायस्कूल येथे घेणेचा प्लॅन आहे.

१६) व्हिएतनाम येथे झालेल्या इंडस्ट्रियल प्रदर्शन मध्ये भाग घेण्यास जावून आलेले आपले क्लब मेंबर रो. अविनाश चिकानिस व रो. राजेंद्र पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

त्याचबरोबर डिस्ट्रिक्ट स्पोर्ट चेअरमन म्हणून काम केलेले रो. संग्राम कुंभार याचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर ही क्लोज मीटिंग स्पॉनसर करून सर्वांचं आदरातिथ्य करून उत्कृष्ट जेवणाची व्यवस्था केल्याबद्दल रो. संजय कदम यांचा सत्कार करण्यात आला. सर्वांनी क्लोज मीटिंग एन्जॉय केली. शेवटी आभार सेक्रेटरी रविंद्र खोत यांनी मानले व मीटिंग संपन्न झाली.



## BOD Meetings







## खरी विश्रांती

भरपूर झोपणं, म्हणजेच फक्त विश्रांती नाही. छोटासा ब्रेक घेऊन नित्याचा ताण कमी करण्यासाठी केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी यात येतात.

**आज मात्र ब्रेकची व्याख्या** – एका कोलाहलातून दुसऱ्या कोलाहलात जाणं – अशी झाली आहे. त्यामुळे आपण ब्रेक हवा म्हणून सुट्टी घेतो, प्रवासाला जातो, भेटीगाठी करतो. पुस्तकं वाचतो. सिनेमे-नाटकं पाहतो. – पण तरीही आतून थकलेलेच राहतो. असं का? कारण आपण विश्रांतीचं मर्म लक्षात न घेता निव्वळ जग चालते तसे चालतो.

खरंतर आपल्याला सात वेगवेगळ्या प्रकारांची विश्रांती हवी असते.

**शारीरिक विश्रांती:**
झोपणे, शारीरिक श्रम किंवा हालचाली न करणे.डोळे, नाक, कान, त्वचा आणि जीभ या पाचही इंद्रियांना विश्राम देणे.

**मानसिक विश्रांती:**
विचारांची, आठवणींची गती कमी करणे, थांबवणे. बाख रेमेडिज, ध्यान, योग याद्वारे मन शांत करणे.

**भावनिक विश्रांती:**
स्वतःच्या मनात गोंधळ घालणाऱ्या भावनांकडे थोडे अलिप्त होऊन बघणे. त्या समजून घेणे, त्यांचा स्वीकार करणे, त्यांच्यावर नियंत्रण मिळवणे.

**सोशल विश्रांती:**
इतरांपासून काही काळ दूर राहणे.विशेषतः ताणतणावाच्या तसेच सतत खूप अपेक्षा करणाऱ्या संबंधांपासून लांब राहून स्वतःला प्राधान्य देणे.

**सर्जनशील विश्रांती:**
आवाजाचा अभाव असलेले बोटांनी करायचे छंद जोपासणे. हस्तकला, चित्रकला, शिवण, मातीकाम, रंगकाम यांसारख्या गोष्टीत सहभागी होणे.

**आध्यात्मिक विश्रांती:**
ध्यान, प्रार्थना करणे. ऊर्जा देणाऱ्या विचारांवर लक्ष केंद्रित करणे.
आपण म्हणजे केवळ हे शरीर ही चुकीची, संकुचित धारणा संपायला याची मदत होते.

**प्राकृतिक विश्रांती:**
पृथ्वी, जल, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभुतांसोबत वेळ घालवणे. निःशब्द होऊन जंगलात फिरणे, समुद्रकिनाऱ्यावर बसणे, आकाश दर्शन करणे.

नुसतं झोपूनही थकवा जात नाही असं वाटतं असेल तर नक्कीच यापैकी अन्य कोणत्यातरी विश्रांतीची आवश्यकता आहे हे नक्की. कारण या सर्व प्रकारच्या विश्रांती आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक असतात आणि त्यांचा संतुलित वापर केल्याने आपल्या जीवनाची गुणवत्ता सुधारते.

तुम्हाला यातली कोणती विश्रांती आज हवीशी वाटते आहे.....?
यावर नक्की विचार करा.

## दुःखाची परिसीमा

- दुःख ही माणसाच्या जीवनाची अविभाज्य आणि अपरिहार्य बाजू आहे. पण कधी कधी ते एवढं गहिरे होतं की शब्दांपलीकडे जाऊन अस्तित्वाचा भाग बनतं. हेच असतं दुःखाची परिसीमा, जिथे भावना गहिऱ्या खोल दरीत गुंतून पडतात, आणि त्या व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडतात.

- जणू काही तुम्ही भर समुद्रात आहात, लाटांशी झुंजत, पण किनारा दिसत नाही. श्वास घ्यायचाही प्रयत्न करताय, पण प्रत्येक श्वास दुःखाच्या वजनाने भारावून जातो. एक प्रकारचं शून्य, जिथे सगळं थांबलेलं असतं, पण तरीही आत एक काळोख चालत राहतो, तुम्हाला गिळंकृत करण्यासाठी.

- दुःखाच्या परिमितीला पोहोचल्यानंतर माणूस क्षणभर स्वतःला हरवून बसतो. तो स्वतःलाच विचारतो, हे कधी संपणार? पण उत्तर कुठेच मिळत नाही. हे दुःख कधी एखाद्या प्रिय व्यक्तीच्या अचानक जाण्यामुळे असतं, कधी अपूर्ण स्वप्नांमुळे, तर कधी नजरेसमोर घडणाऱ्या निराशाजनक वास्तवामुळे.

- दुःखाची परिसीमा म्हणजे काय, हे कदाचित पावसाच्या त्या पहिल्या थेंबासारखं आहे, जो कोरड्या जमिनीवर पडतो आणि क्षणात त्याचं अस्तित्व नाहीसं होतं. पण त्या जमिनीवरची ओल मात्र दीर्घकाळ टिकून राहते. मनही असंच आहे – दुःख त्या थेंबासारखं आत कुठेतरी खोल उतरून जातं, आणि त्याची ओल टिकून राहते आयुष्यभर.

- माणूस यातून बाहेर पडू शकतो का? कदाचित नाही. पण त्या शून्याशी सामना करताना तो अधिक भक्कम होतो, त्याला जीवनाचं वेगळं स्वरूप दिसतं. दुःखाची परिसीमा म्हणजे फक्त वेदना नाही, तर एक शिकवण आहे, की अंधारानंतर प्रकाश उगवतो. जसं की समुद्राला अखेर किनारा सापडतो, तसं दुःखालाही अखेर कुठेतरी एक अर्थ सापडतो – तो आपल्याला स्वतःशी जोडणारा आणि पुढे चालत राहण्याची प्रेरणा देणारा.

- दुःखाच्या परिमितीला जाऊन पोहोचलं, तेव्हा कळलं – आयुष्य म्हणजे फक्त प्रकाश नाही, अंधारही आहे. पण या अंधारातच आपलं प्रतिबिंब स्पष्ट दिसतं.





# Climbing Through Eras:

A Reflection on Nature, Fear, and Sustainability Climbing today has evolved significantly compared to almost four decades ago. Over the last 13 years of my life, the only constants have been climbing and my time in nature. In the modern world, we've almost eliminated fear from our lives. While we encounter fear in forms like exams or uncertain business decisions, the fear I'm referring to is the kind that challenges your survival instincts—the fear where your life is truly at stake, and yet you summon the courage to act.Unfortunately, as human beings, we're gradually losing the ability to step outside our comfort zones due to advancements and convenience. But as Homo sapiens, we are designed to adapt, survive, and thrive under pressure. For me, climbing has been the avenue that keeps me in touch with this primal essence.I feel incredibly fortunate to have had adventurous parents who gifted me a childhood surrounded by nature. As a child, I couldn't have asked for more. The mountains have been my greatest teacher, imparting lessons that no classroom or parent could ever teach. For me, nature and mountains are sacred—they are my temple, my god.Mountains are also critical for the survival of our planet. Without them, Earth would not endure. With the looming threat of vegetation loss and environmental degradation, it's urgent that we acknowledge our role as part of nature rather than separate from it. Climate change isn't just a distant phenomenon; as a climber, I've witnessed its devastating impact firsthand. If we don't act now, there may be no Himalayas left in the coming years.Creating change doesn't require monumental efforts from a few; instead, small actions by many can have a profound impact. Simple habits like carrying a reusable water bottle, walking instead of driving when possible, or reducing single-use plastics can collectively make a big difference. Organizations like Rotary, with their global reach, have the potential to spearhead initiatives that benefit both local and global communities. For example, large-scale river-cleaning campaigns could one day lead to rivers so clean we could drink from them again. Sustainability is no longer a choice but a necessity.As we celebrate International Mountains Day, let us take a collective oath to ensure every step we take is toward preserving an abundant and thriving Mother Earth.Last week, my climbing partner Armaan and I scaled three walls of Tail Baila in a single day: the right outer (270 feet), right inner (250 feet), and left inner (230 feet). We are proud to say we are the first women climbers to achieve this feat in a single day. Back in 1990, my father needed two days to climb a single wall. This speaks volumes about how much climbing has advanced as a sport. It gained official recognition in the Tokyo 2020 Olympics, a significant milestone.Everything I have achieved is thanks to my incredible parents. My sweet mother, who supported my dreams despite the challenges, and my father, the backbone of my existence, have been guiding lights for every milestone I've reached. Their unwavering belief in me has made all the difference.



**Khushi Kamboj**
Climber














Scanned with OKEN Scanner

# Quotes










## शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारुढ पुतळा



**पुतळ्याची थोडक्यात माहिती**

**पुतळ्याचा अनावरण दिनांक:** १ डिसेंबर १९७४

**हस्ते:** श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण, तत्कालीन परराष्ट्र मंत्री, भारत सरकार.

**शिल्पकार:** बी.आर. खेडकर, पुणे

**केवळ पुतळ्याची उंची:** १८ फूट ६ इंच

**चौथऱ्याची उंची:** १८ फूट

**चौथऱ्यासह पुतळ्याची एकूण उंची:** ३६ फूट ६ इंचएए

**पुतळ्याची लांबी:** २० फूट

**पुतळ्याचे वजन:** आठ टन (संपूर्णपणे ब्राँझ धातूमधील घडण)

**पुतळ्याभोवतीच्या वर्तुळ उद्यानाचे क्षेत्रफळ :** २.१३ एकर

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारुढ पुतळ्याचा दि. १ डिसेंबर २०२४ रोजी सुवर्ण महोत्सव साजरा झाला. शिल्पकार बी.आर. खेडकर यांनी तयार केलेला या पुतळ्याचे दि. १ डिसेंबर १९७४ रोजी तत्कालीन परराष्ट्र मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते.

युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवाजी विद्यापीठासमोरील वर्तुळ उद्यानात बसविण्यात आलेला पूर्णाकृती अश्वारुढ पुतळा हा देशातील सर्वाधिक देखण्या शिल्पाकृतींपैकी एक आहे. कोल्हापूर शहराच्या अस्मितेचा मानबिंदू म्हणून हा पुतळा आणि त्यामागील शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीकडे पाहिले जाते. शहरातील सर्वाधिक छायाचित्रे काढल्या जाणाऱ्या ठिकाणांपैकी असणारे हे एक महत्त्वाचे ऊर्जास्थान आहे.

हा पुतळा उभारण्यासाठी सन १९७० मध्ये वृत्तपत्रांतून जाहीर प्रकटीकरण देण्यात आले. त्यानुसार पुणे, मुंबई, दिल्ली, चेन्नई आदी ठिकाणच्या प्रख्यात शिल्पकारांनी पुतळ्याची मॉडेल्स विद्यापीठाकडे पाठविली. अंतिमतः पुण्याचे शिल्पकार श्री. बी.आर. खेडकर यांच्या मॉडेलची निवड करण्यात आली. अश्वारुढ पुतळ्याचे काम योग्य पद्धतीने होण्यासाठी खेडकरांनी पुण्याच्या रेसकोर्सवर धावणाऱ्या घोड्यांचे बारकाईने निरीक्षण केले. प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी पुण्यातील मिलीटरी प्रिपरेटरी स्कूलमध्ये एक घोडा आणि स्वार आणून त्यांच्याकडून प्रात्यक्षिके करवून घेतली. धावत्या घोड्याचा लगाम खेचल्यानंतर त्याची मान कशी असेल, मागील पायाचे स्नायू कोठे आणि कसे ताठर होतील, हे त्यांनी खेडकरांना दाखविले. त्याचप्रमाणे शिवरायांची भावमुद्रा, आभूषणे, पोषाख आदींविषयीही सूचना केल्या. सन १९७१मध्ये प्रत्यक्ष पुतळ्याच्या कामास सुरवात होऊन तीन वर्षांत पुतळा पूर्ण झाला. पुतळ्याचे विविध भाग पुण्याहून आणून ते जोडण्याचे काम खेडकर यांनी पुढील दोन महिन्यांत पूर्ण केले. पुतळ्याच्या चौथऱ्याचे काम कांचीपुरम् येथील डॉ. अमरेंद्र कुमार यांनी केले असून त्यासाठीचा गुलाबी ग्रॅनाईट दगड आंध्र प्रदेश, तमिळनाडूमधून आणण्यात आला. तमिळनाडूमधून कारागीर आणून चौथऱ्याचे काम करण्यात आले आहे.

या पुतळ्याच्या उभारणीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील भोगावती, दूधगंगा–वेदगंगा, कुंभी–कासारी, वारणा आणि पंचगंगा या सहकारी साखर कारखान्यांचे ऊस उत्पादक शेतकरी सभासद यांच्यासह विद्यापीठाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आणि नागरिक यांनी उदारहस्ते देणगी दिली. कारखान्यांनी प्रत्येकी रु. ६०,००० आणि विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांकडून रु. ६६,५९० अशी एकूण रु. ३,६६,५९० इतकी देणगी प्राप्त झाली. त्या देणगीतून हा पुतळा उभारण्यात आला आहे.



Scanned with OKEN Scanner






Scanned with OKEN Scanner